# अश्मफुलोरा

अजित पाटणकर



# अश्मफुलोरा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे प्रकाशन कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# अश्मफुलोरा

अजित पाटणकर

ई साहित्य प्रतिष्ठान

अश्मफुलोरा

अजित पाटणकर

1ST FLOOR, DAULAT BUILDING, OPP DR BHAVIN UPADHYAY CLINIC, KHARIVAV ROAD, RAOPURA, VADODARA – GUJARAT 390 001

(M) 83204 31255

Ajitp@tuflex.murugappa.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क कवीकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी कवीची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

**e**sahity@gmail. com

**e**Sahity Pratishthan

**e**leventh floor

**e**ternity

**e**astern express highway

Thane.

प्रकाशन : ३ मार्च २०२०



©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे .

## अश्मफुलोरा...




## प्रस्तावना

नमस्कार !! " अश्मफुलोरा" हा माझा पहिलावहिला काव्यसंग्रह, या निमित्ताने प्रस्तावना लिहायला घेतली आहे खरी पण भावना दाटून आल्याने काय लिहू आणि काय नको अशी काहीशी अवस्था झाली आहे.

माझं सगळं बालपण मुंबईत गेलं आणि १९९४ साली आम्ही गुजरातमधील बडोदे येथे स्थायिक झालो. शालेय शिक्षण अर्थातच मराठीतून झाले त्यामुळे मला लहानपणापासूनच मराठीची आवड होती.

शिकत असतांना ना धो महानोर, कुसुमाग्रज, गोविंदाग्रज, शांता शेळके, सोपानदेव चौधरी, पु ल देशपांडे, इंदिरा संत अशा कित्येक साहित्यिकांचा माझ्यावर प्रभाव पडत गेला. विशेष म्हणजे प्रा. शिवाजीराव भोसले यांच्या तत्वज्ञानाचा माझ्यावर बालवयापासूनच प्रभाव होता, त्यामुळे ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, तुकाराम, स्वामी विवेकानंद, योगी अरविंद ई. माझी श्रध्दास्थाने झाली. इयत्ता ४थीत असतांना आपण लिहू शकतो हे थोडसं लक्षात आलं आणि मग माझ्या लिखाणाचा ओघ सुरू झाला.

मी बडोद्याच्या महाराजा सयाजीराव विश्वविद्यालयातून २००३ साली मराठीची पदवी संपादन केली आणि पुढे २०१८ साली बडोद्यात झालेल्या ९१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात निमंत्रितांच्या कविसंमेलनासाठी माझी निवड झाली. त्यात थोडासा वेगळा विषय घेऊन, वेशांच्या जीवनावर माझी एक कविता सादर केली आणि ती सर्वांना खूप भावली. खूप शिकायला मिळाले. माझ्या कवितांना एक नवी दिशा प्राप्त झाली. या मानाच्या शिरपेचात आणखी एक तुरा खोवला गेला तो म्हणजे येत्या वर्षी उस्मानाबाद येथे झालेल्या ९३ व्या अखिल

भारतीय मराठी साहित्य संमेलनात कविकट्टा या उपक्रमात माझ्या कवितेची निवड झाली. नुकत्याच बडोदे येथिल मराठी वाङ्मय परिषदेने प्रायोजित केलेल्या एका कार्यक्रमासाठी बडोदे आकाशवाणीवर माझ्या काही कवितांचे ध्वनिमुद्रणही झाले आहे.

मराठीत गूढ लेखनाच्या पंथात कवी ग्रेस हे अग्रस्थानि मानले जातात, त्यांच्याही कविता मला भावल्या आणि कळत नकळत का होईना पण काहीसा गूढ आशय असलेले भाव माझ्या काही कवितांतून उमटले.

वास्तविक कविता कशी सुचते असं कुणी विचारलं तर ती वरून खाली येते आणि मग त्याचा शब्दावतार कागदावर कोरण्यासाठी मंडळी उद्युक्त होतात असे मी म्हणेन. मुळातच स्फूर्ती हा प्रकार अगम्य आहे.

या संग्रहातल्या कविता वाचकांना नक्की आवडतील अशी मी आशा करतो आणि "वेडावाकुडा गाईन, परी तुझाची म्हणविन" या उक्तीला अनुसरून काहितरी लिहिण्याचा प्रयत्न केला आहे, एवढे सांगून माझी प्रस्तावना आटोपती घेतो.

अजित पाटणकर

शब्दस्पर्शी
दि. २९-०२-२०२०

बडोदे

ज्यांनी मला हाताला धरून इथवर आणलं

त्या सर्व सर्व गुरूजन व माझ्या वडिलांच्या स्मृतीला

ही अश्मफुले समर्पित

अजित पाटणकर

# अश्मफुलोरा

आज खुणावते मला
माझ्या माहेरची वाट
दृष्ट लागोना कुणाची
आणि सुखा गालबोट

माझ्या माहेरची वाट
जसा झरोका मायेचा
आनंदाच्या वनामध्ये
कल्पवृक्ष हा छायेचा

माझ्या माहेरची वाट
वाट डोंगराएवढी
कृष्ण माझा बंधुराया
त्याची माया गं केवढी

माझ्या माहेरच्या घरी
उभी दारात वहिनी
भाऊ माझा भाग्यवान
अशी लाभाया सजणी

माझ्या माहेरची वाट
काय वर्णू थाटमाट
सारा मायेचा पसारा
त्याची गोडी शब्दातीत

सुरुवात २५-०९-२०१८
पूर्तता १६-०५-२०१९
दु. ०३:१७

आज कुठूनशी मला खुणविते
मावळतीची धूसर चादर
निळेच सारे, निळीच आभा
निळ्या चांदण्या मग डोईवर

कुठून पडतो हलकासा मग
दुरांतरावर नाद जरासा
पाऊल थबके त्याच्यासाठी
जीवही मग घेई कानोसा

गर्द दाटता मेघ आभाळी
उत्कट मग ती होई राधा
कानी ये पाव्याचा सुस्वर
कान्ह्याची तिज होई बाधा

निळीशार ती धरा जाहली
निळ्या जाणिवा निळी पल्लवी
अथांग सत्ता निळ्या नभाची
निळसर प्रेमा हळूच मीरवि

कुशीत घेई निशाही सारे
मावळतीचे हे गहिरेपण
दिनकर मग तो निळ आशेचा
जगास पुन्हा दावि जीवन

दि. १५-०५-२०१९
सायं. ०७:०३

आज ओढूनि घ्यावी वाटे
नक्षत्रांची काळी चादर
निर्गुण काळ्या आसमंती या
मेघ दाटले भरली घागर

अशाच कातरवेळी कोणी
वहात जाई या गर्तेतून
आठवणींच्या मंद झिणझिण्या
गतकाळाला येति खेचून

सगुणाला मग मूर्च्छा येते
अफाट पाहून दिव्य पसारा
ग्लानीमधुनी जागृत व्हाया
निर्गुणच मग देई आसरा

अशाच नामी सारे विरले
पाहुनी सृष्टीचा हा चाळा
अद्‌भुत माझ्या दारामध्ये
उभा पहिला विठू सावळा !!

दि. १५-०५-२०१९
रात्रौ. ०९:१७

जरा चालूया चार पाऊले
हातामध्ये हात घेऊनि
आनंदाने मोजू शलाका
क्षितिजवरती नजर ठेऊनि

क्षणात देऊ तिलांजली मग
मनातल्या साऱ्या दुःखांना
विहरत राहू स्वच्छंदाने
सुखास मग ती नुरते सीमा

गतकाळाच्या स्मृतीत रमुया
विसरुनी जाऊ सारे मीपण
काळ दावितो नव्याच वाटा
हर्षभरे मग उजळे जीवन

हिशेब करुनि जुन्या चुकांचा
झाले गेले सोडूनि देऊ
हातामध्ये हात घेऊनि
पुन्हा नव्याने चालत राहू !!

दि. १५-०५-२०१९
सायं. ६:२४

कुणास ठाऊक कसा वाहतो
स्वच्छंदी हा वादळ वारा
साथीस याच्या सागरसरिता
मनमोहक मग धुंद किनारा

त्याच्यासंगे वहात जावे
विसरावे मग आपुले मीपण
एकरूप होता त्याच्याशी
तिमिर उजळे त्या तेजातून

कुणी जीव तो कातरवेळी
कधी विसावे या पवनावर
वायुसुद्धा प्रेमळ मोठा
हळूच घाली त्यावर फुंकर

उंच यशाचे शिखर गाठूनी
कुणी घेतसे दिव्य भरारी
थकलेला तो जीव कुणाचा
मिळे तयाला पुन्हा उभारी

या वाऱ्याची त-हा निराळी
स्वच्छंदी हा सगळे उधळी
कुणास करितो साथ सुखाची
कुणास नेई वेळी अवेळी

दि. १४-०५-२०१९

रात्रौ. ९:४९

आज जरी अंगात बाणला
स्थिरपणाचा अविचल बाणा
गुंतून माझे श्वास मोकळे
अन चेहरा तो केविलवाणा

प्रारब्धीचे सूर उमटले
आयुष्याच्या वाटेवरती
द्रव्याचीही भिकार सत्ता
जडली तिजवर निस्सीम प्रीती

उलथून पडता सारीपाट हा
मोजू तरी मी किती सोंगट्या
छिन्नभिन्न या आयुष्याच्या
बांधीत राहू किती वळकट्या

देवाजीच्या घरात सारा
जमाखर्च तो लिहितो कोणी
दूषित होता सारे पाणी
मागे उरती खोटी नाणी

दि. १४-०५-२०१९
रात्रौ. ९:२३

सांगू कशा कुणाला
माझ्याच वेदना मी
चिंता उरात साऱ्या
डोक्यात वेध नामी

जळत्या चितेवरी या
मी शांत झोपलेला
समोर अवाक सारे
क्षितीजात राख नामी

काही सुखात होते
की आज संपलो मी
माझे मलाच ठावे
कोणास घाव वर्मी

येतील न्यावयाला
अस्थी उद्या जरी हे
करतील विसर्जनाचा
भलताच खेळ नामी

घ्यावा असा निरोप
सुखदुःख संपवावे
आत्म्यास आठवावे
येणार तेच कामी

दि. १३.०५.२०१९
सायं.६:३५

गणित कुठं चुकतंय
खरच काही कळत नाही
अन सरतेशेवटी आयुष्याचा
हिशेब काही जुळत नाही

लहानपणी वाटायचं
मोठेपण बरं  असतं
भाबड्या आयुष्यापेक्षा
खोटेपण शोभून दिसतं
वळचणीचं पाणी काही
आढ्याकडे वळत नाही
अन सरतेशेवटी आयुष्याचा
हिशेब काही जुळत नाही

लहानाचा मोठा झालो
असाच हिशेब करत करत
पानावर पान लिहीत,
एकेक वही भरत भरत
पण भरलेल्या वह्या आता
रद्दीवाला घेत नाही
अन सरतेशेवटी आयुष्याचा
हिशेब काही जुळत नाही

जगण्यासाठी खातो,
की खाण्यासाठी जगतो

हाच एक सवाल आता
माझ्या मनात सलतो
दिवेकर दीक्षित करून सुद्धा
पोट कमी होत नाही
अन सरतेशेवटी आयुष्याचा
हिशेब काही जुळत नाही

दि. ०५-०७-२०१९
रात्रौ. १०:३१

एक धुंद संध्याकाळ
मी बसलेला
समुद्रकिनाऱ्यावर,
एका हातात तुझा हात
आणि दुसऱ्या हातात ग्लास

तू नको नको म्हणत असतांना
मी घेतलेले दोनचार घोट
आणि काही अंशी
माझ्याच कर्तृत्वानं
वाढलेलं तुझं पोट

अंगाला झोंबणारा
तोच गार वारा
प्रेमासाठी आसुसलेली तू
नि माझ्या अश्रुधारा

उबग आलाय आता सगळ्याचा
नि
प्रकर्षानं जाणवायला लागलंय
मला अलीकडे
माझ्यातला षंढपणा

काहीच मिळवता आलं नाही
आजवर आयुष्यात
गमावून बसलो सगळंच

सरसकट
अगदी तुलाही

आता भान आल्यावर
जाणवू लागल्यात वेदना
पण इलाज नाही

असच चालत राहायचं
तू, मी, समुद्राने,
आणि वाऱ्यानेही !!

दि. ०६-०७-२०१९

नाही करता आलं तरी
करण्यासारखं बरच आहे
तोडलेलं असलं तरी
जोडण्यासारखं बरच आहे

प्रेम करा खुल्लम खुल्ला
बाळगु नका कसलीच भिस्त
आजी आजोबांच्याच काळात
शोभत होती त्यांची शिस्त
माणुसकीच्या बाजारात
घेण्यासारखं बरच आहे
तोडलेलं असलं तरी
जोडण्यासारखं बरच आहे

गोळा करून पुष्कळ धन
काय शेवटी फायदा होतो
चार खांदे एक तिरडी
इतकाच काय तो वायदा होतो
आलो एका थेंबातून
नि राखेमध्ये घरच आहे
तोडलेलं असलं तरी
जोडण्यासारखं बरच आहे

म्हणून म्हणतो जगता जगता
आयुष्याचं ठेवा भान

स्वतःबरोबर दुसऱ्याच्याही
अस्तित्वाचा राखा मान
व्यक्ती वल्ली लोप पावते
सगळं कीर्तीवरच आहे
तोडलेलं असलं तरी
जोडण्यासारखं बरच आहे

दि. ०५-०७-२०१९
रात्रौ. १०:५६

ओल्या मातीलाही कधी
येई काळाचा सुगंध
धरा हरखून जाई
कवे मावेना आनंद

किती रहस्ये दडली
धरित्रीच्या या गर्भात
वेणा किती रे सोसल्या
तिने थाटात माटात

आज जाणावे वाटते
तिच्या अंतरीचे गूज
थोडी ऐकावी हळूच
निसर्गाची कुजबुज

आता गळुनीया पडो
पिढ्या पिढ्यांचे जोखड
पाणी पिऊन नवेली
झाली धरणी ओसाड

चला पिकवू हे शेत
घेऊ नांगर हातात
नका पुसू आता मला
माझ्या आनंदाचे गोत्र

दि. २८-०७-२०१९
स. ०९:५१

आता वाटते पुन्हा नव्याने
धडे शिकावे बालपणीचे
अक्षर ओळख सुरुवातीला
क्षण वेचावे आठवणींचे

शाळा सुटता सैरावैरा
धावावे घरच्या ओढीने
अन विहरावे मैदानावर
सवंगड्यांसह मग जोडीने

चला खेळुनी पाहू एकदा
भातुकलीचा खेळ जरासा
लुटुपुटूचा डाव मांडुनी
बघू कुणाचा पडतो फासा

सुट्टी लागता प्रशालेस मग
जाऊ मामाच्या गावा या
चिंचा, बोरे, करवंदांनी
झोळी अपुली भरुनी घ्याया

आठवणींच्या रम्य शलाका
थोड्या उरल्या, थोड्या सरल्या
स्मृतीपटलावर सागरलहरी
कितीक आल्या, निघून गेल्या

दि. १२-०८-२०१९
स. १०:५२

एकदा खरेदीला निघालो
पण
मला जे हवं होतं
ते कुठेच सापडेना

खूप दुकानं फिरलो
प्रत्येकाचं एकच उत्तर
स्टॉक संपलाय

मला हवा होता
आनंद
नाही मिळाला कुठेच
थोडासाही पुरला असता

एक दुकानदार म्हणाला
थोडं अंतरावर जा
देऊळ लागेल
पायरीवर एक
सन्यासी भेटेल

त्याच्याकडे आहे
तुम्हाला हवी असलेली गोष्ट

मग निघालो त्या रोखाने
गेलो देवळात

शोधून काढला सन्यासी
नि बसलो त्याच्या पायथ्याशी

निमग्न होता तो
निजानंदात
हात जोडले गेले
आपोआपच

म्हंटलं,
महाराज, मलाही द्याना
थोडासा आनंद
हसला फिदीफिदी

म्हणाला,
अरे, ते तुझ्याजवळच आहे
ते तुला पुन्हा कसं देऊ ?
याच्यासाठी तुझी दुःख
कुठे गहाण ठेऊ ?

बघ जरा डोकावून आत
नि सांभाळ स्वतःचा आत्मा
घरातच भेटेल तुला
निर्गुण परमात्मा !!

दि. १२-०७-२०१९
दु. ०१:००
आषाढी एकादशी

तुझ्या नामापेक्षा, काय आहे मोठे
वन्हीचे सामर्थ्य, वन्ही जाणे

सोयरीक तुझी, घडो पदोपदी
वासना भीतरी, सांडू पाहे

कितीक रे मांडू, डोंबार्याचा खेळ
जुळो ताळमेळ, अंतरीचा

होऊ दे गा देवा, ऐशी सूक्ष्म स्थिती
लागो मनोवृत्ती, सत्कार्याशी

नाहीतरी जीणे, कस्पटासमान
लाभो तया मान, हरिकृपे

चित्त राहो सदा, तुझ्या पायापाशी
जगा उद्धरीशी, तूच हरी

जाहला अंधार, दिसेनाशी वाट
धरी आता बोट, पांडुरंगा

हेचि खरे सुख, देखीयले मुख
अजित भावुक, घननिळा....

दि. १२-०७-२०१९
दु. ०१:००
आषाढी एकादशी

पूर्वीसारखा खरच आता
भरत नाही उर
मनात मात्र आठवणींचं
माजलेलं काहूर

फुटक्या नशिबावर
रडतो मीच नव्याने
भांबाऊन जातो कधीकधी
आठवणींच्या थव्याने

नाही दाखवत कुणी आता
पूर्वीसारखी ओळख
सगळीकडे " पुढे व्हा "
असाच दिसतो फलक

मांडून बसलोय आज पुन्हा
आयुष्याचं दुकान
गोजिरवाणी रात्र दावि
मला एक सपान

पांडुरंगा, एकादशीला
आज तरी पाव
नाहीतर खरंच विसरेल
मला माझा गाव

दि. १२-०७-२०१९
स. १२:०६
आषाढी एकादशी

जीव सैरावैरा धावे
आज पळत्याच्या पाठी
कशी मायेच्या धुंदीने
विसरली नातीगोती

अरे माणसा, माणसा
नको माणुसकी सोडू
पिढ्या चालत आलेल्या
नको परंपरा मोडू

नको गाडी रे बंगला
नको जमीनजुमला
नको प्रेमाच्या नात्याला
भाऊबंदकीचा घाला

आयुष्याच्या दुकानात
गच्च भरले सामान
नको डावलु कधीच
थोरामोठ्यांचा रे मान

खांदा द्यावया असुदे
तुला कुणी मानकरी
नाहीतर सहा फूट
जागेसाठी तू भिकारी

दि. ११-०७-२०१९
रात्रौ. ११:१५

या रम्य तळ्याच्या काठी
ही सुखद सांज दरवळते
अन शोधितो नव्याने
मी तुझे नि माझे नाते

हे चिंतन चिरंतनाचे
ती दिसे दूरची आभा
हलकेच तरंगे त्यावर
मग सुखद स्मृतींचा गाभा

गवसणी घालतो तेव्हा
मी माझ्या आकाशाला
देहात चांदणी फुलते
मी मनात घुंगुरवाळा

शोधता सापडे काही
ते पुन्हा नव्याने मजला
ही निशाच होते साक्षी
बांधीत प्रीतीचा इमला

दि. ०९-०७-२०१९
रात्रौ. १०:२६

एक सुखद संध्याकाळ
हलकासा संधीप्रकाश
समुद्राच्या वरचं एक
नि माझं निराळं आकाश

निसर्गालगतच्या बाकावर
बसलेला मी
आणि खिडकीतून पाहणारी
तू

वाऱ्याच्या संथ लयीच्या तालावर
हलकेच तरंगणारे पक्षी
आणि भरीस भर म्हणून
नियंत्याने रेखाटलेली नक्षी

मी नादावलेला, धुंदावलेला
काहीसा धास्तावलेला
विरहाच्या व्याकुळतेने
थोडा सुस्तावलेला

जगणं नको वाटतं कधीकधी
तुझ्या असण्यानं
पण
माझ्याजवळ नसण्यानं

मग शोधत रहातो मी

स्वतःलाच

तुझ्यामध्ये, निसर्गामध्ये

समुद्रामध्ये

कोण जाणे,

आणखी कशाकशात....

दि. ०८-०७-२०१९

रात्रौ. ०९:४४

गणित कुठं चुकतंय
खरच काही कळत नाही
अन सरतेशेवटी आयुष्याचा
हिशेब काही जुळत नाही

लहानपणी वाटायचं
मोठेपण बरं  असतं
भाबड्या आयुष्यापेक्षा
खोटेपण शोभून दिसतं
वळचणीचं पाणी काही
आढ्याकडे वळत नाही
अन सरतेशेवटी आयुष्याचा
हिशेब काही जुळत नाही

लहानाचा मोठा झालो
असाच हिशेब करत करत
पानावर पान लिहीत,
एकेक वही भरत भरत
पण भरलेल्या वह्या आता
रद्दीवाला घेत नाही
अन सरतेशेवटी आयुष्याचा
हिशेब काही जुळत नाही

जगण्यासाठी खातो,
की खाण्यासाठी जगतो

हाच एक सवाल आता
माझ्या मनात सलतो
दिवेकर दीक्षित करून सुद्धा
पोट कमी होत नाही
अन सरतेशेवटी आयुष्याचा
हिशेब काही जुळत नाही

दि. ०५-०७-२०१९
रात्रौ. १०:३१

हा धुंद पाऊस
मातीचा सुगंध
त्यात चिंब भिजलेली तू
नि तुझ्या देहाचा गंध

तुझ्या हलक्याशा स्पर्शाने
येतात शहारे अंगावर
गात्रे मात्र शिथिल
नजर तुझ्या रंगावर

मी स्तब्ध, पाऊस नि:शब्द
दोघेही जणू भांबावलेले
या सर्वाला तुझे डोळे
नेहमीसारखेच सरावलेले

समुद्रातही रोजच्यासारखी
लाटेमागून लाट
लख्ख उजेड असूनही
दिसत नाही वाट

झेलत रहातो पाऊस सारा
असाच मग अंगावर
पूर्वजन्मीची पापं माझी
घेऊन माझ्याच शिंगावर

दि. ०६-०७-२०१९
रात्रौ. ०८:२४

एक धुंद संध्याकाळ
मी बसलेला
समुद्रकिनाऱ्यावर,
एका हातात तुझा हात
आणि दुसऱ्या हातात ग्लास

तू नको नको म्हणत असतांना
मी घेतलेले दोनचार घोट
आणि काही अंशी
माझ्याच कर्तृत्वानं
वाढलेलं तुझं पोट

अंगाला झोंबणारा
तोच गार वारा
प्रेमासाठी आसुसलेली तू
नि माझ्या अश्रुधारा

उबग आलाय आता सगळ्याचा
नि
प्रकर्षानं जाणवायला लागलंय
मला अलीकडे
माझ्यातला षंढपणा

काहीच मिळवता आलं नाही
आजवर आयुष्यात
गमावून बसलो सगळंच

सरसकट
अगदी तुलाही

आता भान आल्यावर
जाणवू लागल्यात वेदना
पण इलाज नाही

असच चालत राहायचं
तू, मी, समुद्राने,
आणि वाऱ्यानेही !!

दि. ०६-०७-२०१९
सायं. ०६:०७

नाही करता आलं तरी
करण्यासारखं बरच आहे
तोडलेलं असलं तरी
जोडण्यासारखं बरच आहे

प्रेम करा खुल्लम खुल्ला
बाळगु नका कसलीच भिस्त
आजी आजोबांच्याच काळात
शोभत होती त्यांची शिस्त
माणुसकीच्या बाजारात
घेण्यासारखं बरच आहे
तोडलेलं असलं तरी
जोडण्यासारखं बरच आहे

गोळा करून पुष्कळ धन
काय शेवटी फायदा होतो
चार खांदे एक तिरडी
इतकाच काय तो वायदा होतो
आलो एका थेंबातून
नि राखेमध्ये घरच आहे
तोडलेलं असलं तरी
जोडण्यासारखं बरच आहे

म्हणून म्हणतो जगता जगता
आयुष्याचं ठेवा भान

स्वतःबरोबर दुसऱ्याच्याही
अस्तित्वाचा राखा मान
व्यक्ती वल्ली लोप पावते
सगळं कीर्तीवरच आहे
तोडलेलं असलं तरी
जोडण्यासारखं बरच आहे

दि. ०५-०७-२०१९
रात्रौ. १०:५६

नको नको रे पावसा
असा येउस अवेळी
नको भिजवू झोपडी
गरिबाची चंद्रमौळी

नको नको रे पावसा
असा घालूस धिंगाणा
झोपडीत माझा बाळ
निजलेला गोजिरवाणा

नको नको रे पावसा
उगा शेतात बरसू
पिके जातील नासुन
अन वहातील आसू

नको नको रे पावसा
ओला दुष्काळ पांघरू
भूमिपुत्र धास्तावती
कशी जमीन नांगरू

नको खेळू रे पावसा
असा जीवघेणा खेळ
आयुष्याच्या गणिताचा
मग चुके ताळमेळ

दि. ०४-०७-२०१९
रात्रौ. ११:४५

संपून शब्द सारे
निशब्द जाहलो मी
गहिऱ्या क्षणात आता
का स्तब्ध जाहलो मी

श्वासात श्वास होते
ओलावले परंतु
हलकेच भास आता
का लब्ध जाहलो मी

सोसू कितीक साऱ्या
वेणा अशा जिवाच्या
क्षण भंगले सुखाचे
अन दग्ध जाहलो मी

पाहून प्राक्तनाचा
भलताच खेळ सारा
मोडून हा पसारा
उन्मुक्त जाहलो मी

मातीतूनि निपजलो
घेण्या जरी विसावा
मातीत आज माझ्या
संतृप्त जाहलो मी

दि. ०१-०७-२०१९
रात्रौ. १०:५३

असाच लिहीत राहिलो तर
एक दिवस आटेल झरा
खेळ माझा आजवरचा
एका क्षणात संपेल सारा

कुणीतरी वाचतं म्हणून
लिहिण्याला अर्थ आहे (?)
नाहीतर इतकी उठाठेव
कागदावर व्यर्थ आहे

सरस्वतीच्या उपासनेत
मलाही भाग घ्यायचा आहे
थोरामोठ्यांच्या साहित्याचा
मलाही माग घ्यायचा आहे

अक्षरे म्हणजे ब्रह्मानंद
जणू वरून खाली येतात
शब्दस्वरूप घेऊन मग
लेखणीतून प्रकट होतात

कविता जगावी प्रत्येकानं
घ्यावी माळावरची माती
अंतरी होईल दिवेलागणी
तेवत आयुष्याच्या वाती

दि. १३-०२-२०२०
स. ०९:२७

हा सूर्य आज गहिवरतो
मावळत्या संध्याकाळी
मग सोबत करते मजला
अंधार व्रताची समई

या गहिऱ्या रानी उलटी
वाघुळे, सांद्र चित्कार
जणू भाषा देते त्यांची
शब्दांचा चपखल मार

अस्ताला जाता सूर्य
कवडसा एक जरासा
विकलांच्या बुद्धीबळाचा
अवचित पडतो फासा

तम अंबर व्यापुनि उजळी
का दिवाभितांची स्वप्ने
काळोख काजळी फुलते
ही अशीच निष्ठुरतेने

या बोथट आठवणींना
ही कसली किनारमाया
प्रेतासही बंदी आता
या रवीपश्चात जळाया

दि. १०-०२-२०२०
सायं. ०७:०७

आज अचानक शाळेतला भेटला जुना फळा
भंगारवाल्याच्या कोपऱ्यातही उठून दिसला काळा

मला पाहताच चेहेऱ्यावर त्याच्या अष्टभाव दाटले
कुणास ठाऊक किती वर्षांनी जुने सवंगडी भेटले

म्हणाला पहिलीपासून दहावीपर्यंत धरलात माझा हात
खरं सांगा इमानदारीत सोडली का मी साथ ?

कितीक शिकलात माझ्यासोबत विषय असे झोकात
माझ्याकडे यायला मात्र भीती तुमच्या डोक्यात

ओबडधोबड दिसत होतो रंग माझा काळा
तुमच्या अज्ञानाचा काही अंशी केला चोळामोळा

शाळा संपली ऐटीत गेलात महाविद्यालयात
फार लांब नाही, माझ्या भावाच्याच घरात

पदवी घेऊन पुढे गेलात मोठ्या कार्यालयात
तिथेही साथ बा ची माझ्या तुमच्या पसाऱ्यात

खडूपासून मार्करपर्यंत तुमचा खडतर प्रवास
काळिमा मिरवत आणलं तुम्हाला नावारूपास

एवढं करून मला मात्र, भंगारवाल्याचं दार
जागा ठेवा मनाच्या कोपर्यात, अपेक्षा नाही फार

दि. १२-०२-२०२०
स. ०८:३३

चूळ भरावी तशी
कधीकधी थुंकून टाकावेसे वाटतात
जीवनातले सारे कलह

मग मनही स्वच्छ होईल
एखाद्या निरागस मुलासारखं
कोरं करकरीत अंतर्बाह्य

राहणार नाहीत कुठलीच किल्मिषं
आणि स्पष्ट दिसू लागेल तळ
अगदी प्रतिबिंबासकट

होईल थोडसं विपरीत
मानसशास्त्राच्या नियमाला छेद देऊन
पायंडा मोडल्याबद्दल

पण खरच असं झालं तर
कधीच खुडल्या जाणार नाहीत
उमलणार्या नाजुळ कळ्या

आणि जपायचंच ठरवलं तर
कदापि कदापि होणार नाही
भावनांचा पाचोळा

दि. ११-०२-२०२०
दु. ०४:१६

होय, करतो मी साहित्याचं उत्पादन
माझे वरकरणी मित्र असलेल्या
तुमच्यासारख्यांना बोलायला
संधी मिळाव्यात म्हणून

होय, लिहितो मी कविता
कारण अजूनही जाग्या आहेत
माझ्या संवेदना
आणि उघडे आहेत माझे डोळे
जग पाहण्यासाठी

दुखावून जातात मला दुसऱ्यांची दुःख
आणि सुखावून जातो
तुमचा आनंद

खुणावून जातं मला भरून आलेलं आभाळ
आणि विचलित करून जाते
एखाद्या परिचिताची भरलेली वेळ

लढतो आहे मी लढाई अस्तित्वाशी
एवढी बांडगुळं सोबत असताना
जिंकणार नाही माहीत असूनसुद्धा

तुमच्यासारख्या अनेक कौरवांमध्ये
झालाय माझा अभिमन्यू
फक्त आत आत घुसत जाणारा

आता गरज आहे ती
मला या चक्रव्यूहातून बाहेर काढणाऱ्याची
घेताय जबाबदारी ?

दि. १०-०२-२०२०
दु. ०२:११

काळाच्या पडद्याआड सगळं विरत असताना
पुन्हा एकदा नव्याने धुमसू लागतात
हळूहळू थंडावलेले दग्ध निखारे

उसळू लागतं रक्त शरीरभर आणि वाहू लागतात जखमा
पुन्हा एकदा भळाळून, खपली निघाल्यागत

अशा वेळी डोळ्यासमोर एकच यक्षप्रश्न
थारा द्यावा की नाही या निसटून जाणाऱ्या भावनांना

की उकरून काढावीत वैफल्याची वारूळं
नि ओकून टाकावं वैषम्याचं गरळ
घरच्या माळ्यावर साठलेला कचरा काढल्यागत

मग बाजूला होतील नात्यांवरची जळमटं
अन लख्ख चकाकू लागतील सबंध
त्यात कुठूनतरी डोकावतील ऋणानुबंध

हे एवढं सगळं करता करता निघून जाईल जन्म
पण हरकत नाही
मिळेल ना कधीतरी, कुणाचेतरी
पांग फेडल्याचं सुख....

दि. १०-०२-२०२०
दु. ०१:०४

तुज आल्यासरशी आता
पुन्हा जायचे आहे
सोडून श्वास हे सारे
मातीच व्हायचे आहे

सत्कर्मे करुनि सुद्धा
किती करिसी हिशोब त्यांचे
थेंबातूनि घेऊनि जन्म
तिलांजली घ्यायची आहे

बाळगता तोच उराशी
हा अहंकार स्वत्वाचा
सरणावर शेवट त्याचा
एकला पाह्यचा आहे

का मनात तुझिया नित्य
या भलत्या आशा आकांक्षा
ही वाळू पायाखालून
सरकून जायची आहे

ही प्रतिमा नित्य नव्याने
तू जपून ठेव अंतरी
शेवटी खिळ्यासमवेत
भिंतीस लटकणे आहे

दि. ०९-०२-२०२०
सायं. ०७:१८

स्वप्नांची उडली धूळ
एकच तीळ
खावया सात

झोपडी चंद्रमौळी ती
नववधू आत
शिण देहात

ती शांत गहिरी रात्र
लेऊनि उभी
ज्वानीचा मंत्र

कवटीत जळे कामाग्नी
फुलवितो गात्र
लोळ क्षणमात्र

एकांत चहूकडे पसरे
आता सदनात
तरी ती क्लान्त

ते क्षितिज जाहले स्तब्ध
किती निःशब्द
घालीते भ्रांत

शिशिराला पडली भूल
चूल अन मुल
तिच्या पदरात

देहाच्या कुंपणी अवघ्या
आत्म्याची वात
जळे दिनरात

तिज तनूला नव्हती भूक
उमगली चूक
आता शिरी भार

अन स्वच्छ जाहले पाणी
नखशिखान्त फुलतो
तिचा येल्गार

दि. ०९-०२-२०२०
दु. १२:५५

असा झुंजलो
अस्तित्वाशी
झोकून द्याया

जसा रंगला
माडीवरती
अत्तर फाया

कितीक फिरलो
घेऊनि मी
शब्दांच्या कुबड्या

अशा काहीशा
नशा कोरल्या
उरात वेड्या

आता काहीसा
सजाग मी तरी
जातो झोक

अविरत चाले
नियतीची या
गोळा फेक

पुन्हा सावल्या
येऊ घातल्या
उतरंडीला

स्वप्नगाठ मी
मारीत फिरतो
या शेंडीला

दि. ०८-०२-२०२०
रात्रौ. १०:४९

तुझा पाऊस माझा पाऊस
चिंब मनात रुजतो पाऊस
आठवणींच्या गाठोड्यातुन
कधीकधी हसतो पाऊस

वेडी आशा जागवून, वेडा
रेंगाळत राहतो पाऊस
चातकांच्या जाणिवांना
मूर्त स्वरूप देतो पाऊस

तप्त माळरानावरती
फेरफटका मारतो पाऊस
ध्यानीमनी नसताना
अचानक येतो पाऊस

सागरकन्या प्रतिवर्षी
पुन्हा एकदा वरतो पाऊस
तू नसताना कधीकधी
मला जमेला धरतो पाऊस

तुझी माझी चांदणभुल
हळूच कवेत घेतो पाऊस
ग्रीष्मातल्या वणव्याला
घट्ट मिठी घालतो पाऊस

एवढं सगळं करून सुद्धा
कधीच थकत नसतो पाऊस
बहरून येतो सदानकदा
शेवटी असाच असतो पाऊस

दि. ०८-०२-२०२०
रात्रौ. ०९:१५

युगायुगांची रात्र
आता बाजूला
होते आहे

आणि मग उगवते
एक सुंदर
नितांत सकाळ

आता मी माझा नाही
झुगारून टाकलंय
सर्वकाही

भूतकाळाच्या पडद्यात
वर्तमान बांधून
भविष्यात अडकलेल्या

दिवाभितासारखाच
मीही झुरत होतो
कधीतरी, कुठेतरी

पण आता उमजतायत
हरवलेल्या वाटा
अगदी सुस्पष्ट

केशराच्या फुलातून
चंद्रकिरण आरपार जावेत
अगदी तशाच

आणि,

सारे विश्वच सामावून
घेते आहे माझ्या
'मी' पणाला आपल्यात.....

दि. ०८-०२-२०२०
स. १०:४५

आठवतात का तुला
आपले लहानपणचे खेळ
दुपारनंतर संध्याकाळची
बावरलेली सांजवेळ

शाळेच्या शेवटच्या तासाला
मनात असायची घरची ओढ
बापडं घरच्या अंगणात आणि
त्याला सवंगड्यांची जोड

शाळेतून घरी पोचायचो
कसेबसे धावतपळत
आजच्यासारख्या तेव्हा
रिक्षा कुठे होत्या मिळत ?

मधल्या सुट्टीतली उरलेली
खिशात दोनचार चणे बोरं
खेळताना नेमकी टपलेली
त्याच्यावर आजूबाजूची पोरं

पडलो लागलं म्हंटल्यावर
त्यावर लावायची माती
डेटॉल, सॅव्हेलॉन वापरायची
कुणाचीच नव्हती छाती

खेळून घरी आल्यावर
संध्याकाळचा परवचा
सुटका नव्हती म्हंटल्याशिवाय
भरवसा नव्हता जेवणाचा

रात्री मात्र बिछान्यावर
आजीच्या मऊमऊ गोष्टी

मग हळूच जायचं झोपी
होती दृष्टीआड सृष्टी

सगळं विरून गेलं आता
खिशात पैसे पुष्कळ आहेत
वाहवाह होते तोंडदेखल्या
संबंध मात्र फुटकळ आहेत

दि. ०७-०२-२०२०
दु. ०३:०५

आज मागे वळून पाहताना
जाणिवा सुन्न झाल्या आहेत

आणि डोक्यात भिरभिरताहेत
ते फक्त विचार
भावनाशून्य

आता शरीरावर वेदनांचा
पगडा असला तरीही
बसत नाही त्यांची झळ

श्वास रुंदावत चालले आहेत
गात्रे शिथिल होत असताना
मावळत्या संध्याकाळी

देहाला सुटलाय कंप
नि अवघ्या कुडीत
उसळणाऱ्या वातलहरी

आता कुणालाच लक्ष द्यायला
नेहेमीसारखा
वेळ नाही

दि. ०७-०२-२०२०
स. ११:२७

आणि आज माझ्या जागृतीशी
माझाच
ताळमेळ नाही

पूर्वीसारखा खरच आता
भरत नाही उर
मनात मात्र आठवणींचं
माजलेलं काहूर

फुटक्या नशिबावर
रडतो मीच नव्याने
भांबाऊन जातो कधीकधी
आठवणींच्या थव्याने

नाही दाखवत कुणी आता
पूर्वीसारखी ओळख
सगळीकडे " पुढे व्हा "
असाच दिसतो फलक

मांडून बसलोय आज पुन्हा
आयुष्याचं दुकान
गोजिरवाणी रात्र दावि
मला एक सपान

पांडुरंगा, एकादशीला
आज तरी पाव
नाहीतर खरंच विसरेल
मला माझा गाव

दि. १२-०७-२०१९
स. १२:०६
आषाढी एकादशी

असा केशसंभार पाहता प्रियेचा
तिच्या संगतीची जिवा ओढ लागे
स्फुल्लिंग जागे मनी या नव्याने
जणू मग निशा रोजचा चंद्र मागे

समोरी तुझी पाहता छबी गे
किती वर्णू माझ्या मना हर्ष होतो
देहमोहिनी ती कशी भूल घाली
विचारांती मी परामर्ष घेतो

कसे थांबती पाहू जातो नव्याने
उद्वेग, उद्वेष, उत्पात सारे
कसे वाहती आज सदनात माझ्या
तुला स्पर्षणारे बेधुंद वारे

उगा सोसल्या या कळा अंतरीच्या
असा जागलो धुंद रात्री किती
कधीच नव्हतीस माझी तरी तू
लोण्यास या विस्तवाची भीती

अशा अग्निज्वाला असा लोहगोळा
सौंदर्या तुझ्या ते धुमारे किती
विद्‌युल्लते गं जरा थांब आता
पुन्हा कुंठली आज माझी मती

दि. ०६-०२-२०२०
दु. ०१:१५

गेलीस तू क्षणांचे, घालून घाव वर्मी
माझे मला कळेना, आता कसा उरु मी ?

जीव पांगळाच सखये, आता तुझ्याविना गे
सोडून सौख्य सारे, मोडून जाऊ पाहे

अवघे विरून गेले, सोबत तुझी कराया
वाऱ्यासवे जणू हा, गेलाच गंध वाया

अजुनी मनात माझ्या, ती शांत खोल नाती
दु:खासमीप आहे, आता मला विरक्ती

कोंडून भाव गहिरे, गुंफून शब्दपंक्ती
जळती उरात माझ्या, त्या छिन्नभिन्न वाती

दि. ०६-०२-२०२०
स. ०८:५४

अशी अचानक या वळणावर
तुझी नि माझी झाली भेट
आठवणींच्या मोरपिसांनी
देही शहारे येति थेट

झरझर सरला काळ सुखाचा
कितीक होत्या गमतीजमती
अलगद फुलता स्मृतीफुलोरे
सर्वांगी रोमांच दाटती

आता वाटते खेळूनि पाहू
खेळ नवा हा आयुष्याचा
चल ना मांडू डाव घडीभर
सुरेख आशा आकांक्षांचा

व्यर्थ कशाला मनी वहावी
घडून गेलेल्याची चिंता
पुन्हा खुणविते मलाच तुझिया
ओठावरची लाली आता

दावीत माझी सरती वर्षे
ओघळलेल्या बटा तुझ्या
रजनीनाथ आरक्त पाहुनी
मिश्किल साऱ्या छटा तुझ्या

निरंत लाभो साथ तुझी ही
आयुष्याच्या कडेकपारी
शीतल छाया देत रहा तू
ग्रीष्माच्या मज भरदुपारी

दि. ०५-०२-२०२०
स. १०:५९

ऋतू अचानक बहरुनि येता
कशिया झाडा फूटे पालवी
नियतीची ही गम्मत न्यारी
वसंतातली चंद्रमाधवी

उगाच का तो चातक झुरतो
आभाळाचिया थेंबांसाठी
उगाच का ते गीत फुलतसे
येता श्रावण धरणीभेटी

वेडी होते सृष्टी सारी
गंध पारवा भिरभिरतो
नवयौवन मग धरित्रीलाही
ललनेओष्ठी गुणगुणतो

जाता हा दिनकर अस्ताला
शशीधर येई सदनात
किती चंद्रिका सवे खेळती
हर्ष माईना गगनात

असाच अविरत काळ चालला
नित्य नव्या या उषा निशा
रविकर येई रोज नव्याने
पुन्हा फुलविण्या दाही दिशा

दि. ०४-०२-२०२०
दु. ०३:३५

माझा मला नव्याने, गर्दीत भेटलो मी
आता उरात माझ्या, अस्फुट साठलो मी

तरळून सर्व जाई, निमिषात पापण्यांच्या
मागे पुन्हा न माझ्या, केव्हाच पाहिले मी

साऱ्या अभेद्य भिंती, भोवतालच्या पडीक
शोधावयास जाता, क्षणमात्र थांबलो मी

झोकात नाव माझी, वाऱ्यास लागलेली
तेव्हा मला न कळले, पाण्यास झोंबलो मी

अव्यक्त काल सारे, शब्दातूनि परंतु
ते व्यक्त आज होता, गर्दीत सांडलो मी

दि. ०२-०२-२०२०
स. १०:४२

नदीकाठच्या देवळाबाहेर
एक भिकार्याचं पोर
बसलं होतं
घट्ट पाय रोवून

हात पसरत
येणाऱ्या जाणाऱ्यांपुढं

अन त्याच्या बाजूला
नुकतीच वयात आलेली
त्याची मोठी बहीण
सौंदर्याची वस्त्र लेऊन

रोजची अन्नान्न दशा
अंगात नव्हतं त्राण
पण त्याही अवस्थेत तिला
लागला होता मदनबाण

वरचेवर यायचा एकजण
घालायचा त्यांना भीक
अन हळूच म्हणायचा तिला
थोडी शाळा शिक

बघता बघता एक दिवस
तो तिच्यावर भाळला

अन मग मात्र त्याने तिच्या
केसात गजरा माळला

होशील का माझी राणी
त्यानं विचारून घेतलं खरंच
कसला आनंद तिला
जणू पाय आभाळावरच

आईबाप नव्हते तिला
संमतीचा नव्हताच प्रश्न
ती झाली याची राधा
आणि हा तिचा कृष्ण

आता लग्नानंतर तिघांना
चाळीतल्या खोलीची वैखरी
अन प्रेमाची भीक मागून मागून
हा आता भिकारी....

दि. २९-०१-२०२०
दु. ०३:४०

हळू मनावर घाली फुंकर
अशीच आहे माझी कविता
ना तिजला शब्दांचे बंधन
कशा वहाया उगाच चिंता

अक्षरांची या भरून ओंजळ
कणाकणाने लिहू पाहतो
साहित्याच्या समुद्रात या
नाव मधोमध नेऊ पाहतो

स्वछंद निर्झर प्रवाहिपणा
तिच्या दाटला अंगोपांगी
वहिस माझ्या पान शोभते
जणू माझी प्रिया वामांगी

तिला न भीती कशाकशाची
उगा नसे हा तिच्यात गुंता
हळूच उमटे पानोपानी
सरस्वतीचा घेऊन खलिता

दि. २९-०१-२०२०
सायं. ०५:१२

दिस सारा झेलावला
हेलावल्या सांजवेळी
अन लेखणीला माझ्या
आता शब्दांची सावली

माय माय म्हणुनी ते
जसे आक्रंदे लेकरु
आटलेला पान्हा पुन्हा
पिलासाठी होई सुरु

असे काहीसे जाहले
आज माझ्याही मनाचे
सोस सोसुन उरती
काही क्षण आसवांचे

क्षितीजाच्या पलीकडे
सीमा ओलांडून यारे
रातराणीसंगे चला
बहरुन जाऊ सारे

दि. १६-०८-२०१६
रात्रौ. १०:४९

तू आलीस आणि गेलीस
माझ्या आयुष्यातून

मी मात्र उगाचच
बहरत राहिलो
पारीजातकासारखा,

तुझ्या आठवणींचे
सडे घेऊन

अजूनही देतात
मंद सुगंध
त्याच आठवणी

अजूनही आठवतात
मी तुझ्या केसात
माळलेले गजरे

आणि मग,
हळुवारपणे लाजणारी तू
अन चेहेर्यावरचे भाव
कावरेबावरे

मग मी समजावतो
स्वतःलाच
तुझ्या आठवणींच्या
कुशीत शिरून

आता सगळं संपलय
उरलंय ते फक्त
अनंतात विलीन झालेली
तू

आणि आपल्या भावनांची
थकबाकी....

दि. २८-०१-२०२०
सायं. ०५:३७

कसे हरवले सूर
बिघडला नूर
अस्थिर चित्त

स्मृतींचे थवे
पुन्हा अवनवे
घालिती गस्त

दूर आकाशी
भिडे गगनाशी
चांदणी मस्त

मी आज एकटा
नाही कुणाची
मनास भिस्त

भिरभिरे गारवा
धुंद मारवा
गहिरी शिस्त

चहूकडे पातली
प्रेतास करण्या
गिधाडे फस्त

अंधार दाटता
दिशात तुझिया
ओठाची लाली

तव यौवन लेऊनि
सांज गहिरी
मी भोवताली

मोडून मनाचे
विस्तीर्ण क्षणाचे
हे कंगोरे

नखशिखांत हादरे
उरी वाहती
वादळवारे....

दि. २७-०१-२०२०
सायं. ०५:२४

शब्द वेल्हाळ वेल्हाळ
काय त्याची नजाकत
त्याला लागेना कुणाची
वावरण्या इजाजत

शब्द एकच मायेचा
लेकराचे थांबे रडे
त्याच्यापुढे सारे व्यर्थ
दुनियेचे बैलवाडे

शब्द प्रियेचा माझिया
माझ्यासाठी अट्टाहास
देई मनास उभारी
मग थांबेना का श्वास

शब्द ओंकाराचा साऱ्या
राही विश्वास व्यापून
कितीतरी त्याची व्याप्ती
कसा ठेवावा थोपुन

शब्दब्रह्म प्रगटता
नाद होई अनाहत
चित्त जातसे रंगून
आणि मन अनावृत्त

दि. २४-०१-२०२०
दु. ०३:५६

आभाळ अंतरीचे, वाहून आज गेले
मी अश्रूलाही मुकलो, सारेच पांगलेले

पाहता नदीकिनारी, प्रतिबिंब आपुले मी
क्षण लोपताच सारे, पाणी लयास गेले

शोधीत मीही फिरलो, तो चंद्र भाकरीचा
कळलेच नाही मजला, आयुष्य यात गेले

पोटात दुःख होते, ओठात वेदना अन
पाठीत खंजीराने, सारे पुन्हा निमाले

हळुवार भावनेला, थारा नसे कुठेही
प्रेतास आज अग्नी, त्याने कणात नेले

मातीच व्हावयाचे, होते जरी परंतु
अस्तित्व आज माझे, गर्दीत सांडलेले

दि. २१-०१-२०२०
रात्रौ. ११:०२

येताच तू समोरी
क्षण चिंब जाहलेले
कालोद्भवि ऋतूंच्या
गर्तेत नाहलेले

येताच तू समोरी
का बोलली अबोली
आरक्त रातराणी
गंधात धुंद झाली

येताच तू समोरी
झाकोळल्या दिशाही
हरपून भान सारे
तेजाळली निशा ही

येताच तू समोरी
निस्तब्ध जाहलो मी
लावण्य साक्षीला या
का लब्ध जाहलो मी

येताच तू समोरी
मी माझा मुळी न उरलो
रूपावरी तुझ्या मी
अंगार मात्र जळलो

दि. २१-०१-२०२०
रात्रौ. ०९:२०

असेच जगणे आज नव्याने
आयुष्याच्या पानगळीतून
अवखळ निर्मळ झरा वाहतो
मनामनांच्या खोल घळीतून

काही लाघवी काही विखारी
किती स्मृतींची फुटे धुमारी
तरीही जागृत मनात आशा
पुन्हा लढाया उद्यासमोरी

दिवसामागून दिवस जातसे
आयुष्याचे घटते अंतर
परंतु राही मनात अपुल्या
भाकरीस ते स्थान निरंतर

जगता जगता वर्षे सारी
कितीक सरली कितीक उरली
हिशेब करीता अवांतराचा
कितीक शक्ती वाया गेली

परमेशाचे नाम घेऊनि
सार्थकी लावू जीवन सारे
असेच जगता आज नव्याने
चैतन्याचे वहातील वारे

दि. २१-०१-२०२०
स. ०८:१९

आज पुन्हा एकदा
नव्यानं शोधतोय मी
माझ्या अस्तित्वाच्या
साऱ्या खाणाखुणा

अश्या वेळी होत जातात
आठवणींच्या सुरवंटांची
फुलपाखरं....

अतिशय हळुवारपणे
गिरक्या घेतात
आपल्याच भोवती

पण नको वाटतं
काहीवेळा
त्यांचं फिरणं

आणि मी पहात रहातो
समोरचं
धुसरलेलं क्षितिज
अगदी निश्चलतेने

जिथे आठवणींना
अंत नाही
आणि ठाव घ्यावा वाटला तरी,
मन मात्र शांत नाही....

दि. १७-०१-२०२०
रात्रौ. ११:१६